संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
30 OCT 2025
प्राप्त झाले सही......................

सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्री.स्वप्निल सुभाषचंद्र सुपासे, लेखा अधिकारी.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२५/प्र.क्र.१०१/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-३० ऑक्टोबर, २०२५.

संदर्भ:-१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश क्र.जिप/शिक्षण/स्थाब२ ७७९०/२०२३, दिनांक २८.०९.२०२३.
२) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश क्र.ससंलेको/अम/आस्था- २/म.वि.ले.से.एकतर्फी कार्यमुक्त./५०९/२०२३/२६१८, दिनांक ०४.१०.२०२३.
३) वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.३१२/कोषा प्रशा-२, दिनांक १४.१२.२०२३.
४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश क्र.ससंलेको/अम/आस्था- २/म.वि.ले.से.एकतर्फी कार्यमुक्त./८७२/२०२३/३११८, दिनांक १८.१२.२०२३.
५) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश क्र.प्रादुविअ/अम/अ-५/कार्यालयीन आदेश/श्री.सुपासे/२०२३/१८, दिनांक ०४.०६.२०२४.
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.ससंलेको/अम/आस्था- २/म.वि.ले.से.एकतर्फी कार्यमुक्त./७६६/२०२४/११८८, दिनांक ०२.०७.२०२४.
७) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको / प्रशा-राप / का. ६ / श्री. सुपासे / ०३.२५ / २९४ / २६५ / १३१७, दिनांक २१.०३.२०२५.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील श्री.स्वप्नील सुभाषचंद्र सुपासे हे लेखा अधिकारी (शा. पो. आ.) शिक्षण विभाग, प्राथमिक, जिल्हा परिषद, अमरावती येथे कार्यरत असताना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक २८.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री.सुपासे यांना प्रशासकीय कारणास्तव दिनांक २८.०९.२०२३ (म.नं.) रोजी एकतर्फी कार्यमुक्त केले.

२. श्री. सुपासे यांच्या दिनांक ०३.१०.२०२३ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांचे संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक ०४.१०.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री. सुपासे यांना दिनांक ०३.१०.२०२३ (म.पू.) पासून सहसंचालक, लेखा व कोषागारे यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती येथे प्रतिक्षाधिन लेखा अधिकारी रुजू करुन घेण्यात आले.

३. शासन आदेश, वित्त विभाग दिनांक १४.१२.२०२३ अन्वये श्री. सुपासे यांना लेखा अधिकारी (अं. ले. प), प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय, अमरावती या पदावर पदस्थापना देण्यात आली. त्यानुसार, सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे संदर्भाधिन क्र. ४ येथील आदेशान्वये प्रादेशिक दुग्ध

व्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय, अमरावती येथे हजर होण्यासाठी श्री. सुपासे यांना दिनांक १८.१२.२०२३ (म.नं.) कार्यमुक्त करण्यात आले.

४. त्यानुषंगाने, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय, अमरावती यांचे संदर्भाधिन क्र.५ येथील आदेशानुसार श्री. सुपासे यांना दिनांक १९.१२.२०२३ पासून कार्यालयात रुजू करुन घेण्यात आले

५. श्री. सुपासे यांनी दिनांक ०३.१०.२०२३ ते दिनांक १८.१२.२०२३ या प्रतिक्षाधिन कालावधीत कोणतीही रजा घेतलेली नाही.

६. श्री.सुपासे, लेखा अधिकारी यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधिन कालावधी पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.२९.०९.२०२३ ते दि.०२.१०.२०२३ | ०४ | दिनांक २९.०९.२०२३ रोजी ईद-ए-मिलादची सुट्टी, दिनांक ३०.०९ २०२३-शनिवार व दि.०१.१०.२०२३-रविवार सुट्टी आणि दिनांक ०२.१०.२०२३ रोजी महात्मा गांधी जयंती सुट्टी. |
| २. | दि.०३.१०.२०२३ ते दि.१८.१२.२०२३ | ७७ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत- सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती येथे कार्यरत. |
| | एकूण | ८१ | |

७. यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) या तरतूदीच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. स्वप्नील सुपासे यांचे दिनांक २९.०९.२०२३ ते दिनांक १८.१२.२०२३ रोजीपर्यंतच्या एकूण ८१ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती,*
६) श्री. स्वप्नील सुभाषचंद्र सुपासे, लेखा अधिकारी,*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)